


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१२, मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## नृत्यांगणा थिरकल्याच ! पण पारंपारिक वेशात!

■ पारनेर तालुक्यात बैल पोळ्याच्या उत्साहाला उधाण ■ कान्हूरात नृत्यांगणांबरोबरच तरूणाईही थिरकली ■ बैलांबरोबरच ट्रॅक्टरचीही मिरवणूक

**पारनेर : प्रतिनिधी**

**पोळ्या राज्यात प्रसिध्द असलेला कान्हूरपठारचा पोळा यंदाही धडाक्यात पार पडला. नेहमीप्रमाणे बैलांपुढे नाचण्यासाठी आणण्यात येणाऱ्या नृत्यांगणांच्या नृत्यावर त्यांच्या वेशभुषेवर आक्षेप घेण्यात आल्याने यंदा नृत्यांगणा थिरकणार की नाही याची चर्चा होती. मात्र परंपरेप्रमाणे नृत्यांगणांना पाचारण करण्यात आले. मात्र तोकडे कपडे परिधान न करता पारंपारिक वेशामध्ये नृत्यांगणांनी आपली कला सादर केली. दरम्यान तालुक्याच्या विविध गावांमध्ये श्रावणी बैल पोळयाचा उत्साह दिसून आला.**

सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मानाच्या बैलाची मिरवणूक सुरू झाली. त्यानंतर गावातील इतर शेतकऱ्यांच्या बैलजोडयाही मिरवणूकीसाठी हजर झाल्या. मुख्य चौकात नृत्यांगणांचे नृत्य सुरू झाल्यानंतर तरूणाईच्या उत्साहाला उधाण आले. उशिरापर्यंत मिरवणूक सुरूच होती. कान्हूरचा पोळा पाहण्यासाठी जिल्हाभरातील रसिकांनी हजेरी लावली होती. विविध मळयांमधील शेतकऱ्यांनी स्वतंत्रपणे मिरणूका काढल्या. दरम्यान तालुक्याच्या विविध भागामध्ये बैल पोळा मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.



■ कान्हूरपठार येथील बैल पोळ्याच्या मिरवणुकीत नृत्यांगना थिरकल्या.

### मिरवणूकीमध्ये ट्रॅक्टरही !

शेतीमध्ये यांत्रीकीकरणाचा वापर वाढल्याने अनेक शेतकऱ्यांकडे बैलजोडया राहिलेल्या नाहीत. त्यामुळे शेतीसाठी ट्रॅक्टर वापरणाऱ्या शेतकऱ्यांनी पोळयाच्या दिवशी ट्रॅक्टरची मिरवणूक काढून पुजा आर्चा केली. दरम्यान, बैलजोडयांची संख्या कमी झाली तर या सणाचे बळीराजाच्या लेखी असलेले महत्व कायम असल्याचे दिसून आले.

### शेतकऱ्यांमध्ये उत्साह

जगाचा पोशींदा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेतकऱ्याकडील बैल जोडीचा गौरव म्हणून देशभरात पोळयाचा सण उत्साहात साजरा करण्यात येतो. यंदा पावसामुळे वाटाण्याचे पीक हातचे गेले असता गेल्या काही दिवसांमध्ये कांद्याला चांगला भाव मिळाल्याने शेतकरी वर्गामध्ये पोळयाचा उत्साह दिसून आला.

### डीजेसह पारंपारिक वाद्येही

विविध गावांमध्ये बैलांच्या मिरवणूकीमध्ये डीजेचा दणदणाट झाला. त्याबरोबरच पारंपारिक ढोल ताशे, सनई ताफा, बँडचाही वापर करण्यात आला. वाद्यांच्या तालावर युवा शेतकऱ्यांनी नृत्याचा आनंदही लुटला.

### सकाळपासूनच लगबग

यंदा चांगला पाऊस झाल्याने नदी, नाल्यांना पाणी आहे. सकाळीच बैलांना तिथे नेण्यात येऊन त्यांना स्वच्छ धुण्यात आले. दुपारपासून बैलांना सजविण्यासाठीची लगबग सुरू झाली. शिंगांना रंगीबेरंगी बेगड चिटकवून, गळयात माळ, घंटया बांधण्यात आल्या. फुगे तसेच पाठीवरील झुलींचाही वापर करण्यात आला. काही शेतकऱ्यांनी रंगाच्या सहाय्याने बैलांना सजविले होते. मिरवणूकीनंतर बैलांना पुरणपोळीचा घास भरविण्यात येऊन पोळयाचा सांगता झाली.

### मानाच्या बैलजोडीची सरपंचांकडून पुजन

कान्हूरमधील मिरवणूकीस सुभाष ठुबे पाटील यांच्या बैलजोडीच्या पुजनाने प्रारंभ करण्यात आला. मुख्य चौकात सरपंच संध्या किरण ठुबे यांनी बैलजोडीचे पुजन केले. यावेळी किरण ठुबे, चंद्रभान ठुबे, तुषार सोनावळे, बापू चत्तर, मा. उपसरपंच शिवाजी शेळके, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत ठुबे हे उपस्थित होते.

### पठारे यांच्या बैलजोडीने वेधले लक्ष

पारनेर शहरात नगरसेवक युवराज पठारे यांच्या बैलजोडीने पारनेरकरांचे लक्ष वेधले. आकर्षकरित्या सजविण्यात आलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये पठारे यांची बैलजोडी विराजमान झाली होती ढोल ताशे, डीजेच्या दणदणाटात निघालेल्या या मिरवणूकीमध्ये शेकडो तरूण सहभागी झाले होते.

### तीन मंडळांकडून नृत्यांगणांचे ताफे

कान्हूरपठारमधील उपसरपंच प्रसाद नवले मित्र मंडळ, बबन व्यवहारे मित्र मंडळ, संदीप तांबे, बाबू जेडगुले मित्र मंडळ यांच्या वतीने नृत्यांगणांच्या तीन ताफयांना मिरवणूकीसाठी पाचारण करण्यात आले होते. प्रत्येक मंडळाने स्वतंत्र डीजे लावण्यापेक्षा एकच डीजे लावण्यात आला होता. एकाच गाण्यांवर तीनही मंडळांच्या नृत्यंगणा तसेच उत्साही तरूण थिरकत होते.

## तालुक्यातील ६४ हजार लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ!

योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा पारनेर तालुक्यातील ६४ हजार २४१ बहिणींना फायदा झाल्याची माहिती लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात यांनी सांगितले.**

थोरात यांनी सांगितले की, आतापर्यंत ६७ हजार ३१५ भगिनींनी या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अर्ज दाखल केले असून त्यापैकी केवळ १५६ अर्ज नामंजुर झाले आहेत तर ६०४ अर्ज दुरूस्तीसाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच २ हजार ३१४ अर्ज नव्याने दाखल करण्यात आले आहेत.

तालुक्यातील एकही भगिनी या योजनेपासून वंचित राहणार नाहीत याची काळजी घेण्याच्या सुचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिल्या होत्या. त्यांच्या सुचनेनुसार अध्यक्ष या नात्याने सर्व शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून ही योजना तालुक्यातील सर्व भगिनींपर्यंत पोहचविण्याचे काम सुरू आहे. या कामात कोणत्याही प्रकारचा हालगर्जीपणा होऊ देणार नसल्याचेही ते म्हणाले.

महाराष्ट्र उर्वरीत पान ३ वर



### १७ सप्टेंबरपर्यंत पैसे जमा होणार

सर्व पात्र महिलांच्या खात्यावर येत्या १७ सप्टेंबरपर्यंत पैसे जमा होणार आहेत. ज्या महिलांच्या खात्यावर यापर्वी तीन हजार रूपये जमा झाले आहेत त्यांच्या खात्यावर १ हजार ५०० तर ज्यांच्या खात्यावर अद्याप पैसे जमा झालेले नाहीत, त्यांच्या खात्यावर ४ हजार पाचशे रूपये जमा होणार आहेत. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत ही योजना पोहचविण्याचे पालकमंत्र्यांत्री राधाकृष्ण विखे यांचे ध्येय असून सादर करण्यात आलेले अर्ज तपासून त्यातील त्रुटी दुर करण्याच्या सुचनाही पालकमंत्र्यांनी दिल्या आहेत.

**सुनील थोरात**
अध्यक्ष, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना

## हिंदुत्ववादी संघटनांची वाळवणे ते पारनेर रॅली

५०० हून अधिक मोटारसायकलचा सहभाग | पारनेर येथे गीतांजली झेंडे यांच्या व्याख्यानाने सांगता

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**हिंदुत्ववादी विचारधारा जागृत ठेवण्याच्या हेतूने तालुक्यातील सकल हिंदू समाजाच्या वतीने वाळवणे ते पारनेर दरम्यान मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ५०० पेक्षा जास्त मोटार सायकलस्वार या रॅलीत सहभागी होऊन जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले.**

श्रावण मासातील शनिवारी हिंदवी विचारधारा आयोजित हिंदू एकता रॅली व व्याख्यान मोठया उत्साहात पार पडले. पद, पक्ष, संघटना, उर्वरीत पान ३ वर



## महामार्गावरील स्ट्रीट लाईटचे काम निकृष्ट

■ अंदाजपत्रकास हरताळ फासून काम सुरू असल्याचा आरोप ■ अपघातास आमंत्रण देणारे पोल न काढल्यास आंदोलन

**सुपा : प्रतिनिधी**

**नगर-पुणे महामार्गावर महाराष्ट्र औद्योगिक विकास प्राधिकरणच्या वतीने स्ट्रीट लाईट बसविण्यात येत असून हे काम अतिशय निकृष्ट होत असल्याने त्यामुळे अपघातांना आमंत्रण मिळणार नाही. अंदाजपत्रकास हारताळ फासून काम उरकण्याचा सपाटा लावण्यात आला असून हे काम न थांबविल्यास आंदोलनाचा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.**

औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगार वर्गाच्या रात्रीच्या सुरक्षेसाठी या महामार्गावर पथदिवे बसविण्यात येत आहेत. रात्रीच्या अंधारात प्रवास करताना कामगारांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. अनेकांना लुटण्याच्या घटनाही घडल्या होत्या. त्यासंदर्भात तक्रारी करण्यात आल्यानंतर हे पथदिवे बसविण्याचे काम हाती घेण्यात आले. पथदिवे बसविण्याचे काम हाती घेण्यात आल्याने कामगार तसेच ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त करण्यात येत होते.

काम सुरू झाल्यानंतर हे काम निकृष्ट होत असल्याच्या तक्रार केल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कामाची पाहणी करण्यात आली असताना अंदाजपत्रकातील तरतुदींप्रमाणे हे काम न करता अतिशय निकृष्ट होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे हे काम पुर्ण होउन दिवे सुरू होण्यापूर्वीच वीजेचे पोल रस्त्यावर कोसळतात की काय अशी भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



■ वीजेचे पोल बसविण्यासाठी तयार केलेले फाउंडेशन काढून खड्ड्यांमध्ये गाडण्याचा प्रताप ठेकेदाराने केला आहे.

### तयार फाउंडेशन खड्ड्यांमध्ये !

हे काम अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसल्याने ठेकेदाराने पोलसाठी रस्त्याच्या मध्यभागी केलेले फाउंडेशन काही ठिकाणी वीजेच्या तारांसाठी अडचणीचे ठरू लागले. त्यामुळे तयार केलेले फाउंडेशन बाहेर काढून दुसरीकडे खड्डा खणून त्यामध्ये बसविण्याचा प्रताप या ठेकेदाराने केला असून त्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

### तर मनसे स्टाईल आंदोलन

धोकादायक पोल पडून दुर्देवी घटना घडू नये यासाठी या कामाकडे महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीच्या प्रशासनाचे लक्ष वेधले असता त्यांच्याकडूनही दुर्लक्ष करण्यात आले. त्यानंतर मनसेच्या वतीने त्यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले असून आता संबंधित अधिकारी या ठेकेदारावर काय कारवाई करणार हे पाहून कारवाई न झाल्यास मनसे स्टाईल आंदोलन छेडण्यात येणार आहे.

अविनाश पवार, नितीन म्हस्के, अक्षय सुर्यवंशी

## ...तर, आम्हाला तुतारी वाजवायला वेळ लागणार नाही !

■ रामराजे निंबाळकरांचा भाजपला इशारा
■ युतीतील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर

**सातारा : प्रतिनिधी**



**भाजपचे माजी खासदार रणजितसिंह नाईक - निंबाळकर आणि त्यांचे साथीदार गल्लोगल्ली दहशत करत आहेत. त्यांच्या दहशतीला सपोर्ट करू नका, एवढीच आपली तक्रार आहे. फरक पडला तर ठीक, अन्यथा तुतारी वाजवायला किती वेळ लागणार आहे, असा थेट इशारा महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी सभापती व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते रामराजे नाईक-निंबाळकरांनी देवेंद्र फडणवीसांना दिला आहे.**

महायुतीत गेल्यानंतर मुस्लिम मतदार दुरावला असल्याने राष्ट्रवादीतील अनेक नेते पुन्हा शरद पवारांच्या संपर्कात जात आहेत. साताऱ्यातील फलटणमध्ये विधानसभेचे माजी सभापती रामराजे नाईक-निंबाळकर यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भुमिकेवर हल्लाबोल करत तुतारी फुंकण्याचे संकेत दिले.

महायुतीत भाजपकडे असलेल्या माढा मतदार उर्वरीत पान ३ वर






फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# सुंदर मी होणार !

**प्रत्येक व्यक्तीला आपण सुंदर आणि आकर्षक दिसावं असं नेहमीच वाटत असतं. प्रत्येक व्यक्ती खरेतर जन्मतः सुंदरच असते. निसर्गाने प्रत्येकाला सुंदर केस, सुंदर त्वचा दिलेली असते. परंतु नंतर हळूहळू प्रदूषण, चिंता, कृत्रिम गोष्टींमुळे, चुकीच्या आहार-विहारामुळे नैसर्गिक सौंदर्य कमी कमी होत जाते. स्त्रिया एका वर्षात सुंदर दिसण्यासाठी किंवा सौंदर्याविषयी काही प्रयोग करण्यासाठी साधारणपणे ४०० तास खर्च करतात, असे एका सर्वेक्षणातून लक्षात आले आहे.**

प्रत्येक स्त्री सुंदर व आकर्षक दिसू शकते. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या निरोगी असेल तर सौंदर्य हे केवळ पांढऱ्या रंगावर (गोऱ्या रंगावर) अवलंबून नाही तर त्वचा किती निरोगी आहे त्यावर अवलंबून असते. केसांचे सौंदर्यसुद्धा केवळ लांबीवर अवलंबून नसते तर ते किती निरोगी, चमकदार आहेत यावर अवलंबून असते. स्त्रीचे वय कितीही असले तरी किंवा केसांचा -त्वचेचा रंग कसाही असला तरी ते निरोगी असतील तरच ते सौंदर्यात भर टाकतात. केस, त्वचा त्याचप्रमाणे इतर अवयवांची काळजी कशी घ्यावी याविषयी काही उपाय थोडक्यात पाहूया...

### त्वचा

चेहरा हा नेहमीच आपल्या अंतर्मनाचा आरसा असतो. आपण निरोगी असू तर त्याचे प्रतिबिंब आपल्या चेहऱ्यावर किंवा त्वचेवर लगेचच दिसून येते. सध्याच्या धावपळीच्या किंवा स्पर्धेच्या युगात आणि घरातील जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांना स्वतःची काळजी घेण्यासाठी फारसा वेळच मिळत नाही. त्यामुळे काही वेळा लवकर फरक दिसावा याच्यासाठी स्वतःच्या मनानेच काही चुकीच्या सौंदर्य प्रसाधनांचा वापर केला जातो. (बाजारात सध्या अशाच काही स्टिरॉईडस् असलेल्या क्रीम मिळत आहेत) अशा चुकीच्या क्रीममुळे अतिशय वाईट दुष्परिणाम पहायला मिळतात.

### त्वचेविषयीच्या काही तक्रारी


- रुक्ष त्वचा
- तेलकट त्वचा
- त्वचेवर मुरुम, तारुण्यपिटिका
- त्वचा काळवंडणे, वांग येणे, चेहऱ्यावर खूप तीळ.
- सुरकुत्या
- निस्तेज त्वचा
- डोळ्यांभोवती काळी वर्तुळे

### रुक्ष त्वचा

त्वचेचा नैसर्गिक कोरडेपणा किंवा तेलटकपणा हा आपल्या त्वचेतील तैलग्रंथीवर अवलंबून असतो. ऊन, धूळ, प्रदूषण, तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधने यामुळे त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी होते आणि त्वचा रुक्ष आणि निस्तेज दिसू लागते. त्वचेतील पाण्याच्या प्रमाणावर त्याची कांती (ग्लो) अवलंबून असतो. जर त्वचेतील पाण्याचे प्रमाण कमी झाले तर त्वचा काळवंडल्यासारखी होते. वयोमानानुसार त्वचेतील कोलॅजिनचे प्रमाण कमी होते आणि त्यामुळेही त्वचा रुक्ष होते. अतिप्रमाणात साबणाच्या वापरामुळेही त्वचेला रुक्षता येते.

### रुक्ष त्वचेसाठी उपाय

- आंघोळीसाठी खूप गरम पाण्याचा वापर करू नये.
- साबणाने वारंवार चेहरा धुवू नये.
- तीव्र रासायनिक सौंदर्य प्रसाधनांचा वापर टाळावा.
- चांगल्या प्रतिच्या मॉईश्चराईजरचा वापर करावा.
- आंघोळीनंतर खोबरेल तेलाचे तीन-चार थेंब पाण्यात मिक्स करून लावल्यानंतरही त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. खोबरेल तेलाप्रमाणेच बदाम तेल, कुंकुमादि तेलाचाही वापर करता येतो.
- अँटीऑक्सिडंट असणाऱ्या पदार्थांचा जेवणात वापर करावा. (उदा. आवळा, लिंबू, गाजर)
- ग्लिसरिनचा चांगला उपयोग कोरड्या त्वचेसाठी होतो. (एक चमचा ग्लिसरिन एक चमचा गुलाबजल एकत्र करून कोरड्या त्वचेवर लावणे.)
- कोरफड गर आंघोळीच्या आधी १० मिनिटे लावून ठेवून नंतर धुतल्यास त्वचेचा कोरडेपणा कमी होतो.
- तेलाप्रमाणेच काही फळांचाही वापर आपण पॅक म्हणून करू शकतो.
- अर्धे पिकलेले केळे कुस्करून घेणे. त्यात एक चमचा खोबरेल तेल एकत्र करून हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्यावर लावून ठेवावे आणि नंतर धुवून टाकावे.
- दोन चमचे बेसन पीठ, अर्धा चमचा आंबे हळद, १ चमचा मध, १ चमचा दुधाची साय, गुलाबपाणी एकत्र करून त्याची पेस्ट करून घ्यावी. ही पेस्ट पूर्ण चेहऱ्याला लावून २० मिनिटे ठेवून नंतर धुवून टाकावे. हा पॅक आठवड्यातून एकदा जरूर वापरावा.





# कोरफडीने खुलवा चेहऱ्याचे सौंदर्य

**हल्लीच्या या धकाधकीच्या दिवसांमध्ये मोबाईलला आणि अत्याधुनिक जीवनशैलीला जितकं महत्त्व दिलं जातं तितकं महत्त्व आपल्या आरोग्याला मात्र दिलं जात नाही. अनेकदा धकाधकीत आपण स्वत:कडे लक्ष देणं विसरतो. त्याचे परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यातून आपल्याला सहज दुसून येतात. जेवणाच्या वेळा, खात असलेले पदारथ, अपुरी झोप, प्रदूषण, ताण यांचा शरीरावर आणि मनावर होणारा परिणाम दिसून येतो. त्वचा हे परिणाम दाखविणारा महत्त्वाचा घटक आहे. शरीराचा अतिसंवेदनशील भाग असणाऱ्या त्वचेवरुनही एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचा अंदाज सहज लावणं शक्य होतं. त्वचा निरोगी ठेवण्यासाठी जाहिरातींमध्ये दाखवल्याप्रमाणे महागड्या क्रिम किंवा सौंदर्यप्रसाधनांचा वापर करण्याची आवश्यकता नसते, तर घरगुती उपचारांनीही त्वचेच्या समस्या दूर होऊ शकतात. त्यासाठी योग्य गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. त्वचेचं सौंदर्य आणि आरोग्य हे दोन्ही चांगले ठेवायचे असेल तर कोरफड आणि हळद हे अतिशय उपयुक्त पदार्थ आहेत. पाहूयात हळद आणि कोरफडीचे त्वचेच्या दृष्टीने होणारे फायदे....**

- वाढणारे वय लपण्यास मदत : वाढत्या वयोमानानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येतात. या सुरकुत्या दिसू नयेत यासाठी ठराविक वयोगटातील महिला आणि पुरुष अनेक प्रयत्न करतात. मात्र त्याचा म्हणावा तितका फायदा होतो असे नाही. कोरफड आणि हळदीच्या वापरामुळे मात्र या सुरकुत्या कमी दिसण्यास मदत होते. १ टीस्पून नारळाचं तेल, १ टीस्पून कोरफडीचा गर आणि १ टीस्पून हळद या एकत्र करुन हा लेप चेहऱ्याला लावा. दोन मिनिटं हा लेप ठेवल्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा.
- त्वचेचे संसर्ग टाळण्यासाठी : खरुज आणि नायटा यांसारख्या त्वचारोगांवर उपचार म्हणूनही कोरफड आणि हळदीचा वापर होतो. ज्या ठिकाणी नायटा किंवा खरुजाची लागण झाली आहे तिथे हळद आणि कोरफडीचा लेप लावल्यास तो भाग लवकर बरा होतो. हळद आणि कोरफड यांच्यामध्ये असणाऱ्या औषधी गुणधर्मांमुळे हे शक्य होतं. हा लेप तयार करण्यासाठी चमचाभर नारळाचं तेल, कोरफडीचा गर आणि हळद घेऊन ही पेस्ट त्वचेवर साधारण अर्ध्या तासासाठी लावून ठेवा आणि त्यानंतर कोमट पाण्याने धुवा.
- मुरुमं नाहीशी करण्यासाठी : त्वचेच्या रंध्रांमध्ये प्रदूषणामुळे जिवजंतू शिरकाव करतात. त्यांचा नायनाट करून त्वचेचं सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी सुद्धा कोरफड आणि हळदीचा सर्रास केला जातो. यामुळे चेहऱ्यावर येणारी मुरुमं कमी होतात. चेहऱ्यावर लावण्यात येणारा हा लेप तयार करण्यासाठी एक चमचा हळद आणि कोरफडीचा गर आणि एक चमचा मध यांचं एकत्र मिश्रण करुन हे मिश्रण मुरुमं असणाऱ्या भागांवर साधारण पंधरा मिनिटांसाठी लावा आणि त्यानंतर चेहरा कोमट पाण्याने धुवा. काहीवेळा असे केल्यास मुरुमं कमी होण्यास मदत होते.
- त्वचेचा रुक्षपणा कमी करण्यासाठी : अनेकांची त्वचा कोरडी असते. अशांना हिवाळ्यात त्वचेची आग होण्याचा त्रास होते. पण त्वचेमध्ये असणाऱ्या पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्यासाठी कोरफड आणि हळद हे रामबाण उपाय ठरतात. ज्यासाठी १ टीस्पून हळद आणि कोरफडीचा गर आणि काकडीचा रस हे सर्व पदार्थ एकत्र करुन ही पेस्ट पंधरा ते वीस मिनिटं चेहऱ्यावर लावून ठेवावी आणि त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवावा.



# कोरफड जेल रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवल्यास काय होते?

**आपलीही त्वचा नितळ, सुंदर आणि डागविरहित असावी, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. पण मुरुम, डाग इत्यादी समस्यांमुळे सौंदर्यामध्ये बाधा निर्माण होते. प्रदूषित वातावरण आणि बदलती जीवनशैली यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक नाहीशी होऊ लागते. त्वचेवर ग्लो येण्यासाठी काही जणी भरपूर प्रमाणात केमिकलयुक्त ब्युटी प्रोडक्ट्सचा वापर करतात. पण कित्येकदा या उत्पादनांमुळे चेहऱ्याचे नुकसान होते. संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी नैसर्गिक घरगुती उपचार करण्यावर भर द्यावा. पण हे उपाय देखील डॉक्टरांचा सल्ला घेऊनच करावेत. कोरफड जेल हे सर्व प्रकारच्या त्वचेसाठी लाभदायक आहे. त्वचेची देखभाल करण्यासाठी हा सर्वात स्वस्त आणि मस्त उपाय आहे. कोरफड जेलमधील पोषण तत्त्वांमुळे चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. कोरफडमध्ये हर्बल आणि औषधी गुणधर्मांचा साठा आहे. ज्यामुळे त्वचा आणि केसांशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. ॲलोव्हेरा जेल आपल्या त्वचेसाठी कसे लाभदायक ठरते? जाणून घेऊया याबाबतची सविस्तर माहिती...**

### चेहऱ्यावर ॲलोव्हेरा जेल लावण्याचे फायदे

कित्येक ब्युटी प्रोडक्टमध्ये ॲलोव्हेरा जेलचा वापर केला जातो. सौंदर्य प्रसाधनांप्रमाणेच कोरफडचा रस देखील चेहऱ्यासाठी लाभदायक आहे. या औषधी वनस्पतीमध्ये ७५ प्रकारचे घटक असतात. ज्यामध्ये मुख्यतः व्हिटॅमिन, खनिजे, सॅलिसिलिक ॲसिड, लिग्निन, सॅपोनिन यांचा समावेश असतो. केमिकलयुक्त प्रोडक्टमुळे होणारे दुष्परिणाम पाहता प्रत्येक जण आता आयुर्वेदिक, हर्बल उपचार करण्यावर भर देत आहेत. नैसर्गिक उपचारांमुळे चेहऱ्याला दीर्घ काळासाठी फायदे मिळतात आणि महत्त्वाचे म्हणजे डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपाय केल्यास दुष्परिणामही होत नाहीत.



- कोरफड आणि काकडी : काकडी व कोरफड एकत्र करून चेहरा आणि डोळ्यांच्या आसपास लावा. कोरफड जेल आणि काकडी मिक्सरमध्ये वाटून घ्या. यानंतर एका स्वच्छ कापडाच्या मदतीने काकडी - कोरफडचा रस बाउलमध्ये गाळून घ्या. हा रस तुम्ही कापसाच्या मदतीने आपल्या चेहऱ्यावर लावू शकता. याद्वारे तुमच्या त्वचेला व्हिटॅमिन ईचा पुरवठा होईल आणि त्वचा हायड्रेट राहण्यासही मदत मिळेल. हवे असल्यास तुम्ही व्हिटॅमिन ई तेलासह देखील कोरफड जेल मिक्स करू शकता. नियमित हे उपाय केल्यास चेहऱ्यावर सकारात्मक बदल पाहायला मिळतील.
- ॲलोव्हेरा फेस स्क्रब : कोरफड जेल आणि ग्राउंड ओटमील एकत्र घ्या. जाडसर मिश्रण तयार करा. नियमित या स्क्रबचा वापर करावा. ओटमील आपली त्वचा एक्सफोलिएट करण्याचं कार्य करते. तर कोरफडमुळे त्वचेला थंडावा मिळतो.
- चेहऱ्यासाठी ॲलोव्हेरा लेप : तुमच्या घरामध्ये कोरफडचे रोपटे असेल तर त्यातील ताजा गर काढून घ्या. यामध्ये ऑलिव्ह ऑइल किंवा नारळाचे तेल मिक्स करा. मिश्रण तयार झाल्यावर चेहऱ्यावर लावा. हेअर पॅक म्हणूनही याचा वापर होऊ शकतो.
- कोरफड जेल रात्रभर चेहऱ्याला लावण्याचे फायदे : आपल्या चेहऱ्यावर शुद्ध कोरफड जेलनं मसाज करा आणि रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवा. यातील पोषण तत्त्वांमुळे त्वचेला लाभ मिळतात. सर्वप्रथम फेस वॉशने आपला चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. कॉटनच्या कापडाने चेहरा पुसून घ्यावा. यानंतर कोरफड जेल चेहरा आणि मानेवर लावा. आवश्यकता वाटल्यास तुम्ही एसेंशियल ऑइलचाही वापर करू शकता. चेहऱ्याचा हलक्या हाताने मसाज करा आणि रात्रभर जेल चेहऱ्यावर राहू द्या. नियमित स्वरुपात हा उपाय केल्यास त्वचेवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते. मुरुम, मुरुमांचे डाग देखील कमी होतात.

# मुलायम, घनदाट केसांसाठी कोरफडीचा वापर!

**एखाद्या चित्रपट किंवा जाहिरातीत अभिनेत्री आणि मॉडेलचे केस पाहून आपलेही केस असे असावेत, असे आपल्यापैकी अनेकांना वाटते. मात्र, काळ्याभोर घनदाट केसांसाठी नेमके काय करावे, हे माहीत नसते. सध्या बाजारात उपलब्ध असणाऱ्या विविध शाम्पू आणि कंडिशनर्समध्ये केमिकलचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे केस खराब होण्याची शक्यता असते. या खराब झालेल्या केसांशी आणखी चुकीचे वागतो आणि त्यामुळे केसांचा पोत आणखीनच खराब होतो. अनेकदा पार्लरमध्ये जाऊन हजारो रुपये खर्च करूनही केस आपल्याला हवे तसे होत नाहीत. मात्र, केसांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी काही सोपे उपाय केल्यास निश्चितच फायदा होऊ शकतो. कोरफड ही उपयुक्त अशी औषधी वनस्पती आहे. त्वचेचा पोत सुधारण्याबरोबरच केसांचे सौंदर्य खुलवण्यासाठी कोरफडीचा उपयोग होतो. कोरफडीतील गरामुळे केस चमकदार आणि मुलायम होण्यास मदत होते. कोरफड ही केसांसाठी नैसर्गिक कंडिशनरप्रमाणे काम करते. पाहुयात केसांना कोरफड लावण्याचे नेमके काय फायदे आहेत...**

- नैसर्गिक कंडिशनर : कोरड्या आणि खराब झालेल्या केसांसाठी कोरफड अतिशय उपयुक्त असते. कोरफडीतील गर काढून तो पाण्यामध्ये योग्य पद्धतीने एकत्र करावा. हे मिश्रण स्प्रेच्या बाटलीमध्ये टाकावे. यामध्ये तेल मिक्स करावे. हे मिश्रण आवश्यकतेनुसार केसांवर योग्य पद्धतीने स्प्रे करा. असे काही वेळा केल्यानंतर तुम्हाला त्याचा नक्कीच चांगला परिणाम दिसून येईल.
- केसांची उत्तम वाढ : लांब केस सगळ्यांनाच आवडतात. लहान असल्यापासून मुलींना आपले केस लांबसडक असावेत असे वाटत असते. पण आहारातील हरवलेली मूल्ये, प्रदूषण यांमुळे केसांचे आरोग्य बिघडते आणि केस तुटण्याचे किंवा गळण्याचे प्रमाण वाढते. या समस्येसाठी कोरफडीची जेल अतिशय उपयुक्त असते. केसांचे आरोग्य टिकविण्यासाठी हा अतिशय उत्तम आणि नैसर्गिक उपाय आहे. कोरफडीची जेल लावल्याने केस वाढण्यास मदत होते.
- केस दिसतात मुलायम : कोरफडीमध्ये मुळातच एक प्रकारचा चिकटपणा असतो. कोरडे आणि प्राण गेलेल्या केसांना वंगण मिळणे आवश्यक असते. तेलामुळे केसांची मुळे बळकट होतात. तर कोरफड लावल्याने केसांचा पोत सुधारण्यास मदत होते. त्यामुळे चमकदार आणि मुलायम केसांसाठी कोरफडीचा वापर अवश्य करायला हवा.
- कोंड्यासाठी उपयुक्त : अनेकांना लहानपणापासून डोक्यात कोंडा होण्याचा त्रास असतो. कोंड्यामुळे डोक्यात खाज येणे, फोड होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. कोरड्या त्वचेमुळे हा त्रास उद्भवतो. केसांची मूळे कमकुवत झाल्यामुळेही कोंडा होतो. अशावेळी कोरफडीचा गर आणि तेल यांचे एकत्रित मिश्रण थोडेसे कोमट करावे. गार झाल्यानंतर हे मिश्रण हलक्या हाताने केसांना लावावे. तीन तासांनंतर कोमट पाण्याने केस धुवावेत. याचा कोंडा कमी होण्यास निश्चितच फायदा होतो.

## शॉर्ट न्यूज

### मोटारसायकल चोरी करणारी टोळी जेरबंद

■ **श्रीगोंदा :** पोलिसांनी मोटारसायकल चोरी करणारी टोळी जेरबंद केली आहे. त्यांना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे. श्रीगोंदा पोलिस शहरात पेट्रोलिंग करीत असताना श्रीगोंदा बसस्टॅण्ड समोर एक व्यक्ती विना नंबर प्लेट वाहन चालविताना आढळला. त्यास पोलिस कॉन्स्टेबल संदीप राऊत व पवार यांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र तो पळून जात असल्याने त्याचा पाठलाग केला. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यातआणले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली. त्याचे नाव सोन्या ऊर्फ अनिल मोतीराम आल्हाट असल्याचे समोर आले.

### कोपरगाव शहरात डेंग्यूचे थैमान

■ **कोपरगाव :** शहरात आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. पावसाळ्यात शहरात साथीचे व संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी प्रशासनाने औषध फवारणी करणे आवश्यक होते. त्या प्रकारची सूचना देखील युवानेते विवेक कोल्हे यांनी दिली होती. मात्र अद्यापही ढिसाळ कारभार करणारी यंत्रणा सुधारली नाही. आमदार डोळझाक करून मनोरंजनाची हौस भागवत आहे. नागरिकांना वाऱ्यावर सोडले आहे तर दुसरीकडे आमदारांच्या तालावर नाचणारे प्रशासन नाच गाण्याचे नियोजन करण्यात मग्न आहे, असा आरोप भाजपा शहराध्यक्ष दत्ता काळे यांनी केला आहे.

### अमृतवाहिनी बँकेची शेतकऱ्यांना कायम मदत

■ **संगमनेर :** सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या अमृतवाहिनी बँकेने कायम शिस्त, काटकसर, पारदर्शकता व सर्व नियमांचे पालन केले असून उत्कृष्ट कामकाज करत संगमनेर तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्याना मोठी मदत केली असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग फमिटीचे सदस्य, आमदार बाळासाहेब थोरात यांनी काढले. संगमनेर सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत से बोलत होते.

### ट्रक चालकाला लुटणाऱ्याला अटक

■ **नगर :** नगर सोलापुर रोडवर कोठी चौकाजवळ ट्रक चालकाला लुटणाऱ्या आरोपीला भिंगार कॅम्प पोलिसांनी अवघ्या बारा तासात अटक केली. सागर उर्फ पिल्या गुलाब सकट असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून फिर्यादीचा मोबाईल जप्त करण्यात आलाय. किरण मैमुन मलीक हे त्यांच्या ताब्यातील ट्रक नगर सोलापुर रोडवर कोठी चौकाजवळ रस्त्याच्या कडेला उभी करून त्यात झोपलेले असताना दोन अज्ञात इसमानी ट्रकचे कॅबीन मध्ये येवुन फिर्यादीचे ताब्यातील रोख रक्कम लुटून नेले.

# दूध व्यवसायातून शेतकऱ्यांची प्रगती - आमदार थोरात

## सात लाख लिटर प्रतिदिन संकलन

◣ **संगमनेर : प्रतिनिधी**

**शेतीला जोडधंदा म्हणून दूध धंद्याकडे बघितले जात होते, मात्र हा प्रमुख व्यवसाय झाला आहे. या व्यवसायातून तालुक्याने मोठी प्रगती केली आहे. सात लाख लिटर दूध प्रतिदिन या तालुक्यात संकलन होत आहे. त्यामुळे मोठी आर्थिक उलाढाल या व्यवसायातून होत आहे, असे प्रतिपादन आमदार बाळासाहेब थोरात यांनी केले.**



संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे बोलत होते अध्यक्षस्थानी चेअरमन रणजीतसिंह देशमुख होते. सुधीर तांबे, लक्ष्मणराव कुटे, बाजीराव पा. खेमनर ,ॲड माधवराव कानवडे, दुर्गा तांबे, डॉ जयश्री थोरात, बाबासाहेब ओहोळ, शंकरराव खेमनर, गणपतराव शिंदे, डॉ. सुजित खिलारी आदी उपस्थित होते.

आमदार थोरात म्हणाले, अत्यंत कठीण परिस्थितीत १९७८ मध्ये संगमनेर तालुक्यात सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी केली. सुरुवातीला १५०० लिटर दूध संकलन झाले. या व्यवसाय संदर्भात शेतकऱ्यांत चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न झाले. तत्कालीन केंद्रीय मंत्री स्व. अण्णासाहेब शिंदे, मनीभाई देसाई व अप्पासाहेब पवार यांनी महाराष्ट्रात हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढावा यासाठी मोठे योगदान दिले. सरकारचा खूप मोठा वाटा दूध व्यवसाय वृद्धीसाठी आहे.

ग्राहकांना एक बाटली दूध मिळवणं देखील खूप अवघड होतं. इतका मोठा तुटवडा दुधाचा होता सात लाख लिटर दूध उत्पादन होत असताना संगममेर दूध संघाकडे साडेतीन लाख लिटर दूध संकलन होते. मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल या व्यवसायातून होत आहे. कमी शेती असलेल्या लोकांनी दूध क्षेत्रात मोठे काम केले आहे. कोरोना कालखंडात महानंदामार्फत दुधाची पावडर करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. दुधाला भाव वाढ मिळावी म्हणून आपण विधानसभेत आवाज उठवला म्हणून पाच रुपये अनुदान मिळाले.

तालुक्यात रस्त्यांची झालेली दुर्दशा केवळ खडी न मिळाल्यामुळे झाली आहे. क्रेशर बंद करून तालुक्याच्या विकास कामांत व्यत्यय आणला जात आहे, अशी टीका त्यांनी मंत्री विखे यांचे नाव न घेता केली.

रणजीतसिंह देशमुख म्हणाले, दूध उत्पादकांना अनुदान मिळून देण्याच्या क्लिष्ट अडचणींची पूर्तता करून राज्यात सर्वाधिक अनुदान मिळवून देण्याचे काम आपण केले. दूध संघाने या वर्षात ५३८ कोटींची उलाढाल केली असून ४०८ कोटी रुपये शेतकऱ्यांना दूध पेमेंट पोटी मिळाले आहेत. डॉ जयश्री थोरात यांनी इंदिरा महोत्सव अंतर्गत महिला उद्योजकता विकास योजनेबाबत बाबत माहिती दिली. स्वागत व्हा. चेअरमन राजेंद्र चकोर यांनी, नोटीसचे वाचन कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांनी, तर आभार विलास कवडे यांनी मानले.

पक्षाच्या राष्ट्रीय पातळीवर निवड हा संगमनेरचा सन्मान काँग्रेसची राष्ट्रीय कमिटी मध्ये आपली निवड झाली. पक्षावरील निष्ठा, विचारांशी बांधिलकी हे आपण कायम जपले. कधीही सत्तेसाठी उड्या मारल्या नाही. सीडब्ल्यूसी वर निवड होणे हा मोठा सन्मान आहे. हा संगमनेरच्या जनतेचा सन्मान आहे, असे आमदार थोरात म्हणाले.

## वाचकांच्या लेखणीतून

# डोळे आणि दृष्टी

**वो थे न मुझसे दूर न मैं उनसे दूर था।**
**आता न था नज़र तो नज़र का क़ुसूर था।।**

ती माझ्यापासून दूर नव्हती. मी तिच्यापासून दूर नव्हतो. ती दृष्टिपथात येत नव्हती हा दोष दृष्टीचा होता.



त्या वेळी मी मुंबईला नरिमन पॉईन्टच्या फ्री प्रेस हाऊस इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावरील झोनल ऑफिसमध्ये नोकरीस होतो. त्या माळ्यावर एका बाजूला बँकेचे स्टाफ कॅन्टीन होते. दुपारी आमच्या सहकाऱ्यांचा ग्रुप जेवणासाठी कॅन्टीनमध्ये गेला. जेवता जेवता माझी नजर कॅन्टीनच्या कोपऱ्यात गेली. बटाट्यांनी भरलेली एक अर्धवट गोण होती. त्यांतील एक बटाटा विचित्र आकाराचा होता. जसे काय एका लेकुरवाळी महिलेचे एक लेकरू खांद्यावर, एक पाठीवर, एक पोटावर आणि एक कमरेवर बिलगून बसलेले आहे. मला तो बटाटा जरा वेगळाच वाटला! म्हणून जेवल्यावर मी तो बटाटा घेतला आणि त्याच इमारतीत असलेल्या नवशक्ति दैनिकाच्या ऑफिसमध्ये गेलो. तिथे खुर्चीवर बसलेल्या गृहस्थांना माझी थोडक्यात ओळख सांगितली. तो बटाटा त्यांना दाखविला. या विचित्र बटाट्याचा फोटो नवशक्ती दैनिकात छापण्याची त्यांना विनंती केली. त्यांनी माझे आणि बँकेचे नाव एका कागदावर लिहून घेतले. तो विचित्र आकाराचा बटाटा पाहून त्यांनाही नवल वाटले. त्या गृहस्थांनी जवळच्या एका फोटोग्राफरला त्या बटाट्याचा फोटो काढायला सांगितले. माझ्या समक्षच तो फोटो काढला गेला.

दुसऱ्या दिवशी त्या बटाट्याची बातमी नवशक्तीच्या अंकात छापून आली होती. तिच्यात त्या विचित्र बटाट्याचा फोटो, माझे, आमच्या बँक ऑफ इंडियाचे नाव आणि बँक ऑफ इंडिया स्टाफ कॅन्टीनचा उल्लेख होता. ती बातमी मी ऑफिसमध्ये तर दाखविलीच. पण कॅन्टीन मालकालाही दाखविली. तो मराठीच होता. ती बातमी वाचून तो मला म्हणाला, बटाटा माझा आणि नाव तुमचं? माझंही नाव द्यायचं होतं पेपरवाल्यांनी!

मीही त्याला गंमतीने म्हणालो, माणसाला डोळे असले तरी एक दृष्टी लागते. ती आमच्याजवळ होती. तुमच्याजवळ नव्हती. इथेच घोळ झाला हो!

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### तालुक्यातील ६४ हजार लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ!

शासनाच्या अनेक कल्याणकारी योजनांमुळे शिंदे-फडणवीस-पवार सरकारची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली असून विशेषतः मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे महिला वर्गामध्ये सरकार अतिशय लोकप्रिय झाले असल्याचे पवार यांनी सांगितले. तहसिलदार गायत्री सैंदाणे, गटविकास अधिकारी दयानंद पवार यांचे योजनेसाठी चांगले सहकार्य मिळत असल्याचेही थोरात यांनी आवर्जुन सांगितले.

### हिंदुत्ववादी संघटनांची वाळवणे ते पारनेर रॅली

सांप्रदाय दुर ठेऊन विविध हिंदूनिष्ठ संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच राष्ट्र आणि धर्मप्रेमी नागरीकांनी व्याख्यान ऐकण्यासाठी हजेरी लावली होती. वाळवणे येथील श्री.भैरवनाथ मंदिरात महादेवाचा अभिषेक करण्यात येऊन हिंदू एकता रॅलीस प्रारंभ करण्यात आला. रॅलीत सहभागी युवकांकडून घोषणाबाजी करण्यात येत होती. छत्रपती शिवरायांचा जयजयकार करत सुपा, हंगा या मार्गाने ही रॅली पारनेर शहरात दाखल झाली. शहरातील गणेश मंगल कार्यालयात रॅलीची संगता होउन त्यानंतर गीतांजली झेंडे यांचे व्याख्यान पार पडले.

हिंदुत्ववादी विचारसरणी असलेल्या गीतांजली झेंडे यांचे शिव शंभू चरित्र या विषयावर व्याख्यान पार पडले. हंगा येथील संगणक तज्ञ गौरव शिंदे यांनी उपस्थितांचे आभार माणून व्याख्यानाचा सांगता झाली. रॅली तसेच व्याख्यानासाठी तालुक्याच्या सर्वच भागातील सकल हिंदू युवक उपस्थित होते.

**हिंदू एकतासारख्या संघटनांची गरज**

हिंदूंच्या संरक्षणासाठी यापुढील काळात लाठया-काठया घेउन मारामाऱ्या करण्याची गरज नाही. परंतू बुध्दी, लेखणीच्या बळावर आपल्या समाजाचे भले करण्यासाठी हिंदू एकता सारख्या संघटनांची आजूनही गरज आहे.
गीतांजली खाडे
शिवशंभू व्याख्याता

### ...तर, आम्हाला तुतारी वाजवायला वेळ लागणार नाही !

संघातील रणजितसिंह नाईक निंबाळकरांच्या उमेदवारीला रामराजेंनी कडाडून विरोध केला होता. प्रत्यक्ष निवडणुकीत देखील रामराजेंच्या गटाने राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते - पाटील यांचेच काम केले. धैर्यशील मोहिते-पाटील विजयी झाल्यानंतर रणजितसिंह नाईक-निंबाळकरांनी आता रामराजेंच्या निकटवर्तीयांची फोडाफोडी सुरू केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवारी फलटण दौऱ्यावर येतआहेत. या पार्श्वभूमीवर रविवारी फलटणमध्ये झालेल्या बैठकीत रामराजे नाईक-निंबाळकरांनी भाजपाच्या रणजितसिंह नाईक-निंबाळकरांविषयी तक्रार करणार असल्याचे म्हटले आहे. आपलं भांडण भाजपासोबत नाही. माजी खासदारासोबत आहे. ते आणि त्यांचे साथीदार गल्लोगल्ली दहशत करत आहेत. त्याला सपोर्ट करू नका. अन्यथा तुतारी वाजवायला किती वेळ लागणार आहे, असा थेट इशाराच रामराजे नाईक निंबाळकरांनी दिला आहे.

# टाकळीमियाची ग्रामसभा ठरली वादळी!

■ सदस्यांच्या आसन व्यवस्थेवरील खर्चावरून राडा
■ ग्रामस्थांनी पदाधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना धरले धारेवर

◣ **राहुरी : प्रतिनिधी**

**राहुरी तालुक्यातील टाकळीमिया ग्रामसभेत सदस्यांच्या आसन व्यवस्थेवर केलेल्या खर्चावरून राडा झाला. आसन व्यवस्थेवरील खर्च व गावातील विकास कामावर झालेला अनाठायी खर्च, या विषयावरून ग्रामस्थांनी पदाधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यास धारेवर धरले. त्यामुळे टाकळीमिया ग्रामपंचायतीची ग्रामसभा वादळी ठरली.**



ग्रामविकास अधिकाऱ्याने मागील सभेचे इतिवृत्त वाचण्यास सुरुवात केली. त्यावेळी नंदकुमार जुंदरे यांनी आपण वाचत असलेले प्रोसिडींगच्या मागील ग्रामसभेला ग्रामस्थांना आमंत्रित केले नसल्याने ही सभा अनाधिकृत होती. निव्वळ कागदावरच दाखवण्यात आलेल्या या ग्रामसभेत ग्रामस्थांनी मागण्याचे काय झाले? तसेच टाकळीमिया ग्रामपंचायतीमध्ये गरज नसताना सदस्यांच्या आसन व्यवस्थेवर लाखो रुपयांचा खर्च करण्यात आल्याचा खुलासा करण्याची मागणी केली.

टाकळीमिया गावात बसवण्यात आलेल्या वॉटर मशिन व त्यासाठी केलेला खर्च, पथदिव्यांच्या खर्चाचा तपशील देण्याची मागणी करण्यात आली. टाकळीमिया गावासाठी तब्बल ९ कोटी रुपये खर्च करून केलेली नवीन पाणी योजना वाया गेली. मोरवाडीसाठी नवीन पाणी योजना केली. या योजनेच्या मंजुरीसाठी सोनवणे वस्ती व फसले वस्ती येथील लोकसंख्या दाखवण्यात आली. मात्र सोनवणे व फसले वस्ती ग्रामस्थांनी यावर हरकत घेतली. तरी त्यांचा विरोध डावलून हे काम पूर्ण करण्यात आले. या कामाच्या चौकशीसाठी ग्रामपंचायत सदस्यांनी उपोषण केले होते. खळवाडी बालवाडीसाठी आलेला निधी व जागेचा प्रश्नावरही ग्रामसभेत चर्चा झाली.

गावातील रस्त्यांच्या कामावर टाकलेल्या मुरमाबाबत ग्रामस्थांनी विचारणा केली. त्यावर सरपंच गायकवाड यांनी मुरूम मी स्वखर्चाने टाकल्याची माहिती दिली. आपण स्वत: खर्च कशासाठी करता? येथून पुढे वैयक्तिक खर्च करण्याची गरज नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या ग्रामसभेला उपस्थित असलेल्या पंचायत समितीतील अधिकाऱ्याने दिलेल्या खुलाशावर ग्रामस्थांचे समाधान झाले नाही.

# सरकारने राबविलेल्या कल्याणकारी योजनांचा पाठपुरावा करावा

◣ **श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**सरकारने अनेक कल्याणकारी योजना आणल्या व राबविल्या, आपण याचा सातत्याने पाठपुरावा करावा. श्रीगोंदा मतदारसंघात संघटना मजबूत आहे. आमदार बबनराव पाचपुते यांचे काम देखील उल्लेखनीय आहे. अती आत्मविश्वास नको तर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन काम करावे, असे आवाहन केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी श्रीगोंदा येथे भाजपच्या श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघाच्या आढावा बैठकीत बोलताना केले.**

खडसे म्हणाल्या की,राज्यात आपल्याला पुन्हा सत्ता मिळवायची आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजना भाजपचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तळागाळापर्यंत पोहोचवून लोकसंपर्क वाढवला तर येणाऱ्या निवडणुकीत पक्षाला निश्चितच घवघवीत यश मिळेल.

यावेळी बोलताना आमदार बबनराव पाचपुते म्हणाले,मतदारसंघात सर्व प्रश्न सोडवताना आपण सामाजिक बांधिलकीतून सर्व कामे केली आहेत. लोकसभा निवडणुकीच्या वेळी वेगळी परिस्थिती होती, त्यामुळे मताधिक्य घटले. पण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विक्रम पाचपुते व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते सर्व बाबींवर बारीक लक्ष ठेऊन आहेत. त्यामुळे मतदार नक्कीच पुन्हा संधी देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विक्रम पाचपुते यांनी प्रास्ताविक करून केलेल्या कामांचा आढावा दिला. यावेळी श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगरसेवक शब्बीरभाई बेपारी व सहकाऱ्यांनी तसेच विविध गावातील कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. प्रतिभा पाचपुते, दिनूकाका पंधरकर, गणपत काकडे, पोपटराव खेतमाळीस, प्रतापसिंह पाचपुते, बाळासाहेब महाडिक ,संदीप नागवडे, बापू गोरे, पुरुषोत्तम लगड, मिलिंद दरेकर, धनराज कोथिंबिरे, मंगेश घोडके, शुभांगीताई सप्रे, देवयानी शिंदे, सुजाता खेडकर, विद्या शिंदे, उषाताई कर्डिले तसेच सर्व माजी नगरसेवक, भाजपाचे सर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2

डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
◥ प्रसूती पूर्व तपासणी
◥ संपूर्ण प्रसूती उपचार
◥ अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
◥ अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
◥ गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
◥ गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
◥ वारंवार होणारे गर्भपात,
◥ लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
◥ पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
◥ टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट. संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच

मेजर भगवान नांगरे सर
❊ आमची वैशिष्ट्ये ❊
❊ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
❊ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
❊ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
❊ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
❊ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
❊ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
❊ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
❊ ॲडमिशन ओपन ❊
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# मांडओहोळला साकारला अटल घनवन प्रकल्प!

## सुजित झावरे पाटील यांची संकल्पना



**वासुंदे : प्रतिनिधी**

**अटल घनवन योजनेसाठी सुजित झावरे पाटील यांनी सन २०२२ मध्ये गावांतील ज्येष्ठ नागरिकांची सदर वनराई करण्यासाठी चर्चा करून जागा निवडण्यात आली. सदर योजनेचा फायदा आपल्या सर्वांना कसा होईल हे पटवून सांगितले व यासाठी मांडओहोळ याठिकाणी वासुंदे हद्दीतील जागेची निवड करून जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अटल घनवन योजने मार्फत वनराईसाठी निधी उपलब्ध करून सन २०२३ मध्ये अटल घनवन योजनेची सुरुवात करून वृक्षाची लागवड करण्यात आली.**

सध्या घनवन मध्ये ४५ ते ५० पेक्षा जास्त प्रजाती वृक्षाची लागवड करून अत्यंत घनदाट अशी वनराई सुजित झावरे पाटील यांचे संकल्पेतुन करण्यात आली. सदर वनराई पाहण्यासाठी वनअधिकारी यांनी पाहणी करून अत्यंत चांगल्या प्रकारे घनवन योजना केल्याने जिल्हयातील, तालुक्यातील नागरिकांना पाहण्यासाठी नागरिक येत असतात.

**मियावाकी घनवन पध्दत**

मियावाकी पध्दत हि एक वनीकरण तंत्र आहे, जे स्थानिक जातीचा वापर घनदाट, बहुस्तरीय जंगले तयार करण्यासाठी करते, हि वने तयार करण्याचा मुख्य तत्व म्हणजे वृक्षारोपन करण्यासाठी देशी प्रजातीचा वापर मियावाकी पध्दतीमध्ये कमीतकमी जागेत जास्तीत जास्त वृक्ष लागवड केली जाते. यामध्ये वृक्षांची वाढ झपाटाने होते. मियावाकी पध्दत ही ओसाड जमिनीची निवड करून तेथील मुळ निकृष्ट दर्जाची माती खोदुन काढुन तेथे शेणखत, सेंद्रिय खते आणि गहू /भात यांचा कोंडासमप्रमाणात मिसळून त्यावर खड्डे करून आपणास हवी तशी वृक्ष लागवड करता येते. खतांमुळे वृक्षांना भरपूर मुलद्रव्ये मिळतात आणि भाताचे तूस वापरल्यामुळे पाण्याचा निचरा होतो, हवा खेळती रहाते, उपयोगी सुक्ष्मजीव झपाटयाने वाढतात व मोठ्या प्रमाणावर ह्युमस तयार होतो.

या पध्दतीमध्ये एका जागेवर कमीत कमी ५० ते १०० प्रकारची देशी वृक्ष लावण्यात येतात. पारंपारिक पध्दतीने जंगल तयार करण्यास २०० वर्ष सुध्दा लागु शकत परंतु मियावाकी पध्दतीने जेमतेम २० वर्षात आपण घनदाट जंगलाची निर्मिती करु शकतो, जंगल निमित्ती फक्त लाकडासाठी असू नये, त्याचा उपयोग जैवविविधता समृध्द करणे, वनस्पतींचा औषधी गुणधर्माचा मानवी कल्याणासाठी फायदा घेणे आणि कमीतकमी जागेत जास्तीत जास्त हरित क्षेत्र वाढवणे हा हेतु आहे.

यावेळी वनअधिकारी वैशाली भलावी , वनपाल गिरी साहेब, किशोर कड, शंकर बर्वे, किसन धुमाळ, लहानभाऊ झावरे, दिलिप पाटोळे, बाळासाहेब झावरे, खंडू टोपले, गणेश झावरे, शंकर झावरे, दत्तात्रय जगदाळे, पत्रकार गणेश जगदाळे मान्यवर मंडळी उपस्थितीत होते. यावेळी सुजित झावरे पाटील यांच्या कडून वन मजुरांना टोपी वाटप करण्यात आले.

# सुप्याच्या सरपंच मनिषा रोकडे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार

## ■ भास्करराव पेरे पाटलांच्या हस्ते पुण्यात सन्मान ■ ग्रामविकासाच्या विविध विकासकामांची दखल

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा गावच्या सरपंच मनिषा योगेश रोकडे यांना स्वराज्य रक्षक न्यूज वृत्तसेवा समुह पुणे आयोजित आदर्श सरपंच पुरस्कार आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील पिंपरी चिंचवड निगडी प्राधिकरण जवळील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात हा पुरस्कार सोहळा शुक्रवार दि.३० ऑगस्ट रोजी संपत झाला.**

सरपंच सौ. रोकडे यांनी सुपा गावचा पदभार हाती घेतल्यापासून सुमारे तीन ते साडेतीन वर्षात केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजना अंमलात आणून गावात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. जिल्हा नियोजन मंडळासह ग्रामपंचायतच्या स्व निधीतून रस्ते विज पाणी या पायाभूत सुविधांसह अनेक विकास कामे केली आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आरोग्य उपकेंद्र जिल्हा परिषद शाळा अंगणवाड्या यांना भरीव मदत केली असुन मुलांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक ती सर्व मदत केली आहे. गावातील अंतर्गत पक्के रस्ते बांधण्याकडे यांनी भर दिल्याने गावातील अनेक रस्ते चकचकीत झाले आहेत.

सरपंच रोकडे यांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, सुपा ग्रामपंचायतचा शतक मोहत्सव हे कार्यक्रम मोठ्या स्वरुपात साजरे केले. पारनेर तालुक्यातील एक आदर्श गाव बनवण्याच्या उद्देशाने सरपंच रोकडे यांनी सुपा गावचा सर्वांगीण विकास केला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत स्वराज्य रक्षक न्यूज वृत्तसेवा समुह पुणे यांच्या वतीने सरपंच सौ. मनिषाताई योगेश रोकडे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी सुपा पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सरपंच रोकडे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे ना. राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, भाजप तालुकाध्यक्ष राहूल पाटील शिंदे यांच्या सह तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



(छाया - शरद रसाळ, सुपा)

### सर्वसमावेशक काम करण्याचा प्रयत्न

**सरपंचपदाचा कारभार स्वीकारल्यानंतर गेली तीन ते साडेतीन वर्षात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रस्ते, वीज, पाणी यासह सर्वसमावेशक कामे करण्याचा प्रयत्न केला आहे. यात सर्व आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा पुरस्कार मी त्यांना समर्पित करते.**

**मनिषाताई योगेश रोकडे**
**सरपंच सुपा**

# आजी माजी सैनिक परिवारासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शक

## ■ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे प्रतिपादन ■ राळेगणसिद्धीमध्ये सैनिक योद्धा पुस्तकाचे प्रकाशन



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**राळेगण सिद्धी : प्रतिनिधी**

**सैनिक योद्धा पुस्तक हे आजी- माजी सैनिक, त्यांचे परिवार तसेच विध्यार्थ्यांना भविष्यात निश्चितच फायदेशीर ठरणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांनी केले.**

सैनिक योद्धा पुस्तकाचे प्रकाशन सोहळा पद्मभूषण डॉ अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते रविवारी राळेगणसिद्धी येथे पार पडला यावेळी ते बोलत होते.

या अंकाची माहिती संकलक बाळासाहेब नवले यांनी पुस्तकाच्या निर्मिती बाबत सांगताना म्हणाले की, भारतीय सेनेतील आजी व माजी सैनिकांसाठी जिल्हा सैनिक कार्यालय आणि केंद्र व राज्य शासनाकडून सैनिकांसाठी निर्गमित केलेले सर्व नियम आणि शासन निर्णय, सर्व रेकॉर्ड्सचे संपर्क क्रमांक व पत्ता, स्पर्श प्रणाली विषयी माहिती, ई सी एच एस विषयी माहिती, पाल्यांसाठी शैक्षणिक आरक्षण माहिती, माजी सैनिक आराम गृहाची माहिती तसेच कुटुंब पेन्शन इत्यादी सखोल माहिती या पुस्तकात संकलित केली आहे. याप्रसंगी ले. कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त) यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हे पुस्तक सैनिक व सैनिक परिवाराच्या कल्याणासाठी व त्यांना सेवानिवृत्ती पश्चात येणाऱ्या सर्व समस्या निराकरण करण्यासाठी प्रत्येक सैनिकाकडे व सैनिक संघटनेकडे हे पुस्तक असणे अत्यावश्यक आहे.

पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर काही सैनिक संघटनांना तसेच शाळांना पुस्तकाच्या प्रति मोफत देण्यात आल्या तसेच संपादकीय मंडळाकडून काही दिवसात हे पुस्तक प्रत्येक सैनिकास, सैनिक संघटना तसेच शाळांना सदर पुस्तकाच्या प्रति मोफत देण्याचा मानस आहे.

पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ले कर्नल साहेबराव शेळके (निवृत्त), कॅप्टन विश्वनाथ ढवळे, सुभेदार मेजर मारुती पोटघन, सुभेदार मेजर ज्ञानदेव शेळके, बाळासाहेब नवले, दादा पठारे, मधुकर नाना पायगुडे, बाळासाहेब पठारे, राजू मेहेत्रे राज्यकर सहायक, अंबादास तरटे, सौ सरस्वती साहेबराव शेळके, सौ सविता बाळासाहेब नवले, सौ मनीषा निलाख, सौ जयश्री राजू महत्रे, तसेच जातेगाव, पळवे, रूई छत्रपती, बाबुर्डी, नारायणगव्हाण, गटेवाडी येथील सैनिक संघटनेचे पदाधिकारी यांच्यासह आजी माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय साहित्याचे वाटप करून नातवाचा वाढदिवस साजरा !

## मुकुंदराव निघोजकर यांनी जपली सामाजिक बांधिलकी

**निघोज : प्रतिनिधी**

**कन्हैया ज्वेलर्सचे संस्थापक अध्यक्ष, पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक व अल्पसंख्याक समाजाचे नेते मुकुंदराव निघोजकर यांनी नातू अदिराज सुदर्शन निघोजकर याचा वाढदिवस नुकताच पुष्कर लॉन्स येथे साजरा केला यावेळी ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप यामध्ये स्कूल बॅग व स्केच पेन बॉक्स वाटप करण्यात आले.**



यावेळी कन्हैया ज्वेलर्सच्या संचालिका शोभा निघोजकर, सुदर्शन निघोजकर, राणी निघोजकर, ओंकार निघोजकर, ऐश्वर्या निघोजकर, शांताराम निघोजकर, अशोक निघोजकर, शुभम निघोजकर आदींनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले.

बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यावेळी म्हणाले कन्हैया ज्वेलर्सचे संस्थापक अध्यक्ष मुकुंदराव निघोजकर यांनी समाजात धार्मिक व सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणात सेवाभाव करीत निघोज आणि परिसरातील विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. नातवाच्या वाढदिवसाला त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करीत वाढदिवस साजरा करताना आपण समाजासाठी काय करु शकतो हे प्रत्यक्षात दाखवून दिले आहे. पिंपरी जलसेनचे माजी सरपंच लहूशेठ थोरात यांनी यावेळी निघोजकर कुटुंबाचे कौतुक केले. पंढरपूर पायी वारीत सहभागी होऊन कन्हैया ज्वेलर्सच्या संचालिका शोभाताई निघोजकर यांनी सेवाभाव करीत वारीत असणाऱ्या जेष्ठ महिला भगीनींची सेवा करीत सेवाभाव कसा असावा याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

गागरे महाराज यावेळी म्हणाले की कन्हैया ज्वेलर्स उद्योग समूहाचे संचालक सुदर्शन निघोजकर यांनी उद्योग व्यवसाय करताना सर्वसामान्य जनतेला पाठबळ देण्याचे काम करीत कन्हैया ज्वेलर्सच्या माध्यमातून निघोज परिसराचा नावलौकिक नगर व पुणे जिल्ह्यात केला आहे. पंचायत समितीचे सदस्य व देवीभोयरे सोसायटीचे चेअरमन सुभाषराव बेलोटे यांनी यावेळी निघोजकर परिवाराचे कौतुक करीत सेवाभाव प्रत्येक कार्यातून दिसत असून असेच सामाजिक काम जनतेला अपेक्षीत असून वाढदिवस अवश्य करा मात्र आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून सेवाभाव करण्याची गरज असून मुकुंदराव निघोजकर व त्यांच्या कुटुंबीयांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन बेलोटे यांनी व्यक्त केले.

यावेळी मुकुंदराव निघोजकर यांनी प्रास्ताविक भाषणात सर्वांचे स्वागत केले, सुदर्शन निघोजकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी ओंकार निघोजकर यांनी आभार मानले.

# रूपेश ढवण यांचे वृक्षसंवर्धनाचे कार्य समाजाला हितकारक

## माजी सभापती काशिनाथ दाते यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांचे झाडे लावा झाडे जगवा हे वृक्षसंवर्धन कार्य समाजाला हितकारक असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती काशिनाथ दाते यांनी केले.**

यावेळी कृषी फर्टीलायझर संस्थेचे जिल्हा उपाध्यक्ष तसेच निघोज व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी सचिन दादा वरखडे, ज्येष्ठ कारभारी गवरामशेठ लंके, प्रसिद्ध आर्कीटेक्चर वसंतराव वांढेकर तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी सभापती दाते यावेळी म्हणाले सामाजिक व धार्मिक काम करताना रुपेश ढवण यांनी निघोज व परिसरात मोठ्या प्रमाणात सेवाभाव केला असून विकासाभिमुख कामांना पाठबळ देणारे एक युवा नेतृत्व म्हणून ढवण यांचा तालुक्यात नावलौकिक झाला आहे. राजकारणापेक्षा समाजकारण करीत ढवण यांनी गोरगरीब जनतेसाठी काम करीत सातत्याने समाजातील सर्व घटकांच्या सुखादुखात सहभागी होऊन जनसेवेचे मोठे काम करताना वृक्षसंवर्धन चळवळीला पाठिंबा देण्याचे काम करीत सेवाभाव केला असल्याचे प्रतिपादन दाते यांनी केले.

आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांनी यावेळी प्रास्ताविक करताना सांगितले की समाजात सेवाभाव करताना मी रियल इस्टेट या व्यवसायाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला आर्थिक पाठबळ देण्याचे काम करतो. आपला संपर्क महत्वाचा आहे. राजकारणापेक्षा समाजकारण महत्वाचे हा मंत्र आपण देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांच्याकडून आत्मसात केला आहे. पवार साहेब सांगतात की राजकारण २० टक्के व समाजकारण ८० टक्के हाच संदेश घेऊन आपण समाजात कार्यरत असल्याने मातोश्री वास्तुशांतीसाठी दुपारी एक ते रात्री उशिरापर्यंत सात ते आठ हजार लोकांनी भेट देऊन आपल्याला शुभेच्छा दिल्या असल्याची माहिती ढवण यांनी दिली आहे.

# सुपा ग्रामपंचायतीला उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुंजाळ यांची भेट

## ■ विविध योजनांचा घेतला आढावा ■ कामकाजाविषयी समाधान व्यक्त ■ सरपंच मनिषा रोकडे यांनी दिली माहिती



(छाया - शरद रसाळ, सुपा)

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपा ग्रामपंचायतमध्ये जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी दयानंद पवार, विस्तार अधिकारी जगताप, मेहत्रे यांनी भेट देत कामकाज व शासकीय विविध योजनांचा आढावा घेतला.**

केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या नावीन्यपूर्ण योजना पीएम विश्वकर्मा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य योजना या योजनेअंतर्गत सुपा ग्रामपंचायतीने जे काम केले याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी गुंजाळ यांनी समाधान व्यक्त केले. व तळागाळातील लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबत ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले.

सुपा ग्रामपंचायतच्या सरपंच मनिषा रोकडे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करत ग्रामपंचायतच्या कामाची सविस्तर माहिती दिली. केंद्र तसेच राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मिळून देण्यासाठी सुपा ग्रामपंचायत कसे प्रयत्न करते याची सविस्तर माहिती सरपंच रोकडे यांनी अधिकाऱ्यांना दिली. अधिकाऱ्यांनी ही ग्रामपंचायतच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी प्रभारी गट विकास अधिकारी दयानंद पवार, विस्तार अधिकारी जगताप, ज्येष्ठ पत्रकार मार्तंडराव बुचुडे, ग्रामविकास अधिकारी नितीन सुंबे, राहुल पवार, संचित मगर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# खेळ रंगला पैठणीचा... उत्साह, चैतन्य अन् धम्माल मस्तीचा !

## ■ विश्वनाथ कोरडे युवा मंच आयोजित कार्यक्रम ■ निघोजला महिलांचा मोठा प्रतिसाद ■ चारशे जणींना लागली पैठणीची लॉटरी

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोजला उत्साह, चैतन्य अन् धम्माल मस्तीच्या वातावरणात विश्वनाथ कोरडे युवा मंचच्या वतीने श्री.कोरडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी निघोज परिसरातील महिला भगिनींनी हजारोंच्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.**

यावेळी मोठ्या संख्येने आलेल्या महिलांनी खेळ पैठणीचा या कार्यक्रमात सहभाग घेऊन पैठणी जिंकण्याचा मान मिळविला. तब्बल चारशे पेक्षा जास्त महिलांना पैठणीची लॉटरी लागल्याने घराघरात पैठणीची चर्चा सुरू होती. कार्यक्रमादरम्यान निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात केक कापत भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांचा वाढदिवस मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, सरपंच चित्राताई वराळ पाटील, भाजपच्या महिला आघाडीच्या पदाधिकारी व ईरा इंटरनॅशनल स्कूलच्या संस्थापक अध्यक्षा सोनाली सालके यांनी कोरडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत सर्व सामान्य जनतेच्या संपर्कात राहून कोरडे यांनी दिलेल्या विकासकामांची माहिती दिली.

त्यानंतर खेळ रंगला पैठणीचा हा उत्साह, चैतन्य, स्पर्धा, धमाल आणि आकर्षक बक्षीसांची रेलचेल असणारा हा कार्यक्रम कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे अनाहुतपणे नैराश्याच्या गर्तेकडे झुकलेल्या महिला भगिणींना खळखळून हसण्यासाठी व हसविण्यासाठी हक्काचे अन् आपलेपणाची जाणिव करून देणार व्यासपीठ ठरला. दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून महिला भगिनींना सर्व विवंचना विसरून सुखाचा, आपुलकीचा आणि आत्मियतेचा विश्वास देणारा कवडसा ठरला असल्याची, त्यांच्या उपजत कलागुणांना विविध स्पर्धे च्या माध्यमातून या कार्यक्रमात वाव मिळाला असल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

सायंकाळी सात वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री उशिरा पर्यंत सुरू होता. सहा तास सुरू असलेल्या या कार्यक्रमाचा आनंद महिला भगीनी, ज्येष्ठ मंडळी, युवा व युवतींनी मोठ्या प्रमाणात घेतला. पुणे येथील प्रसिद्ध निवेदक व सिने अभिनेता आकाश फल्ले यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हास्याचा आनंद देणाऱ्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे आकाश फल्ले यांनी सदाबहार विनोद करीत उपस्थितांना आनंदाची मेजवानी दिली असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषदचे माजी सभापती काशिनाथ दाते, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यावेळी बोलताना म्हणाले राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी वाढदिवस निमित्ताने राज्य सरकारच्या विविध लोकप्रिय योजनांचा संदेश लोकांपर्यंत जाण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या निमित्ताने राज्य व केंद्र सरकारच्या योजनांची माहिती यामाध्यमातून जनतेला मिळाली आहे. राज्य व केंद्र सरकारने लोकाभिमुख योजनांच्या माध्यमातून राबविलेल्या योजना सर्वसामान्यांसाठी कशा फायदेशीर आहेत हे यातून जनतेला समजले असून अशा कार्यक्रमांची आज खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यावेळी म्हणाले वाढदिवस हे निमित्त आहे. राज्य सरकार व केंद्र सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेसाठी तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत कशा प्रकारे मिळत आहे याची माहिती जनतेला मिळण्याची गरज आहे.म्हणून अशा कार्यक्रमांची आज गरज आहे. आगामी निवडणुकीत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुतीच्या उमेदवारांना मतदान करायचे आहे कारण या भाजपने व महायुतीने राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून जनतेला भरभरून दिले आहे . लाडकी बहीण योजना, वयोश्री योजना, शेतकऱ्यांना विमा योजना या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून भरभरून मिळाले असून या योजना कशा लाभदायक आहेत याची माहिती जनतेला होण्यासाठी वाढदिवसाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून हाच विकासकामांचा संदेश या निमित्ताने घरोघरी गेला असल्याची माहिती श्री.कोरडे यांनी यावेळी दिली आहे.



( छाया : रोहन उनवणे, निघोज )

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com